ePaper

देव तारी त्याला...! 3 दिवस चिखलाच्या ढिगाऱ्याखाली दबलेली 6 वर्षांची चिमुकली सुखरुप



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™





दोन मजुरांचा मृत्यू, तीन मित्र गायब

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 31 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ३०० हून अधिक भारतीय बेपत्ता; सलग चौथ्या दिवशी बचावकार्य युद्धपातळीवर

# नेपाळ जलप्रलयात ७३४ मृत!





**महाईन्यूज । काठमांडू**

**नेपाळमध्ये हिमनदी कोसळल्यानंतर भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे मोठी जीवितहानी झाली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत ७३४ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे २,५०० नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. बेपत्ता नागरिकांमध्ये ३०० हून अधिक भारतीयांचा समावेश असल्याचे नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी सांगितले. दुर्घटनेला चौथा दिवस उजाडला असून रसुवा क्षेत्रासह तीन जिल्ह्यांमध्ये बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.**

हिमनदी कोसळल्यानंतर बर्फ, दगड आणि चिखलाचा मोठा लोट भोटे कोशी नदीत आला. त्यानंतर नदीला अचानक आलेल्या पुराच्या प्रचंड प्रवाहाने अनेक गावे आणि शहरे उद्ध्वस्त केली. घरांसह वाहने, रस्ते आणि पूल वाहून गेले असून विविध प्रकल्पांचेही मोठे नुकसान झाले आहे.

रसुवा क्षेत्रासह तीन जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. पूर आणि चिखलामुळे अनेक भागांतील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून काही गावांचा इतर भागांशी संपर्क तुटला आहे. नेपाळ पोलीस आणि सुरक्षा दलांकडून बाधित भागांमध्ये शोध व बचावकार्य सुरू आहे. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती, ढिगारा आणि वाहून गेलेल्या रस्त्यांमुळे बचाव पथकांसमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. लगतच्या तिबेट सीमेवरही पुराचा परिणाम झाला आहे.



नेपाळ पर्यटन मंडळाने पर्यटकांसाठी १२३४ आणि ११४४ हे आपत्कालीन क्रमांक जाहीर केले आहेत. तसेच टुरिस्ट पोलिसांच्या ९८५१२८९४४५ या क्रमांकावरही मदत मागता येणार आहे. भारतीय दूतावास नेपाळ प्रशासनाच्या संपर्कात असून, बेपत्ता भारतीय नागरिकांचा शोध घेणे आणि पुरात अडकलेल्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यक मदत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाइन

पुरात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी काठमांडू येथील भारतीय दूतावासाने २४ तास कार्यरत हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिक आणि त्यांच्या नातेवाइकांना +९७७ ९८५ १३१ ६८०७ किंवा +९७७ ९७० ९१० ७५०० या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. बीजिंग येथील भारतीय दूतावासाच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावरही संपर्काची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### २० हजार सुरक्षा रक्षक तैनात

आपत्तीच्या काळात बचावकार्यासाठी जवळपास २०,००० सुरक्षा कर्मचाऱ्यांना मैदानात उतरवण्यात आले आहे. जमिनीवर कार्यरत पथकांनी आतापर्यंत ८,७३० जणांना सुरक्षित बाहेर काढले आहे. हेलिकॉप्टरच्या ३६३ फेऱ्यांद्वारे ३,०८१ जणांना (ज्यात २३६ परदेशी नागरिकांचा समावेश आहे) एअरलिफ्ट करण्यात आले असून, महापुरामुळे जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात अडकलेल्या २७९ जणांचीही सुरक्षित सुटका करण्यात आली आहे.

# ग्रँड टूरसाठी ६६२ किमी रस्त्यांची ‘रेस’

## डिसेंबरअखेर कामे पूर्ण करण्याचे लक्ष्य; १ सप्टेंबरपासून कामांना सुरुवात

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे ग्रँड टूरच्या दुसऱ्या पर्वासाठी जिल्ह्यात तब्बल ९०० कोटी रुपये खर्च करून ६६२ किलोमीटरचे रस्ते नव्याने तयार करण्यात येणार आहेत. या कामांमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नाही, याची दक्षता घेण्यासह कामांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड करू नये. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांवर थेट कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. रस्त्यांच्या कामांना १ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष सुरुवात करून ३१ डिसेंबरपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे त्यांनी सांगितले.**



पुणे ग्रँड टूरच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात हाती घेण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांचा डुडी यांनी नुकताच आढावा घेतला. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बावीस्कर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कामांचे नियोजन निश्चित करण्यात आले.

पुणे ग्रँड टूरच्या पहिल्या पर्वासाठी जिल्ह्यातील आठ तालुक्यांमध्ये ४३७ किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले होते. आता दुसऱ्या पर्वासाठी ११ तालुक्यांमध्ये आणखी ६६२ किलोमीटरचे रस्ते नव्याने विकसित केले जाणार आहेत. त्यामुळे दोन्ही पर्वांच्या निमित्ताने जिल्ह्यातील एकूण १ हजार ९९ किलोमीटरचे रस्ते तयार होणार आहेत. दुसऱ्या पर्वातील कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला सुमारे ३६५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

रस्त्यांची कामे निर्धारित वेळेत आणि मानांकनानुसार पूर्ण झाली पाहिजेत. कामांच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण चाचण्या घेण्यात याव्यात. वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा, रस्त्याची जाडी, डांबरीकरण आणि आवश्यक ठिकाणी करण्यात येणाऱ्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची नियमित तपासणी करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. कामे केवळ कागदोपत्री पूर्ण दाखविणे किंवा गुणवत्तेबाबत तक्रारी येणे खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

> पुणे ग्रँड टूरच्या रस्त्यांची कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत. कामांमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर थेट कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे.
>
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी

कामांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित कंत्राटदाराला त्या तत्काळ दुरुस्त करण्यास सांगण्यात येणार आहे. वारंवार सूचना देऊनही सुधारणा न करणाऱ्या तसेच निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामांच्या देखरेखीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

### राजकीय दबावाला बळी पडू नका

रस्त्यांची कामे देताना अथवा ती सुरू असताना कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होणार नाही, याची खबरदारी अधिकाऱ्यांनी घ्यावी. कंत्राटदारांची निवड नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी. कामे मिळविण्यासाठी किंवा निकृष्ट काम स्वीकारण्यासाठी कोणाकडून दबाव आणला गेल्यास त्याची माहिती तातडीने जिल्हा प्रशासनाला द्यावी, असे डुडी यांनी बैठकीत स्पष्ट केले.

# कात्रज-गुजरवाडी रस्ता रुंद होणार; वाहतूककोंडीला मिळणार ‘ब्रेक’!

**महाईन्यूज । पुणे**

**कात्रज चौक ते गुजरवाडी फाटा या मार्गावरील वारंवार होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. प्रभाग क्रमांक ३८ मधील कात्रज चौक ते मांगडेवाडी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने या मार्गावर अनेकदा कोंडी निर्माण होते. या पार्श्वभूमीवर महापालिका अधिकाऱ्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस्त्याची संयुक्त पाहणी केली.**

अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, स्थानिक नगरसेवक व्यंकोजी खोपडे, प्रतिभा चोरघे, संदीप बेलदरे, माजी नगरसेवक युवराज बेलदरे तसेच पथ विभागाचे अधीक्षक अभियंता अजय वायसे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी केली. पाहणीनंतर रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यात आला.

रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी बांधकाम विभागाने विकास आराखड्यानुसार सर्वेक्षण करून रस्त्याचे डीपी मार्किंग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. भूसंपादन विभागाने रस्त्याच्या रुंदीमध्ये येणारी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया करावी, तर पथ विभागाने रुंदीकरणासाठी सविस्तर अहवाल तयार करावा, असे आदेश देण्यात आले.

विद्युत पोलचे स्थलांतर करण्यासाठी विद्युत विभागाकडे प्रस्ताव सादर करणे, रस्त्याच्या रुंदीमध्ये पावसाळी जलवाहिनी विकसित करणे आणि अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

### निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश

कात्रज ते गुजरवाडी फाटा रस्ता रुंदीकरणासाठी परिपूर्ण अंदाजपत्रक तयार करून त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या कामामुळे कात्रज-मांगडेवाडी परिसरातील वाहतूककोंडी कमी होण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.



### झाडे, केबल आणि विद्युत पोलही हटविणार

रस्त्याच्या रुंदीमध्ये येणाऱ्या झाडांचे सर्वेक्षण करून ती हटविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वन विभागाच्या जागेबाबत संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच रस्त्याच्या रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या एमएसईडीसीएलच्या केबल्स भूमिगत करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

# दोन मजुरांचा मृत्यू, तीन मित्र गायब

## तिघांचे मोबाइल बंद; निगडी 'डक्ट' दुर्घटनेत संशय बळावला!

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**निगडी प्राधिकरणातील भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) फायबर ऑप्टिक 'डक्ट'मध्ये गुदमरून मृत्यू झालेल्या दोघांबरोबर असलेले त्यांचे तीन मित्र बेपत्ता असून, त्यांचे मोबाइलही बंद आहेत. पथकांकडून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर नेमका काय प्रकार घडला, हे स्पष्ट होईल. मृत्यूप्रकरणी जबाबदारी निश्चित होत नसल्याने गुन्हा दाखल केला नसल्याचे पोलिसांनी सांगितले.**



मनोज बाबूराव शिंदे (वय २६) आणि अमोल अशोक शिंदे (वय २०, मूळ – सिद्धेश्वर, ता. औंढा, जि. हिंगोली) अशी मृत्युमुखी पडलेल्या मजुरांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज त्याच्या भावाबरोबर नाशिक येथे केबल दुरुस्तीचे काम करत होता. तो बुधवारी सकाळी नाशिक येथून मित्र अमोलकडे आला होता. त्यांना या डक्टमध्ये उतरण्यास कोणी सांगितले, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. बीएसएनएल अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कंपनीच्या वायफाय व टेलिफोन केबलचे जाळे शहरभर आहे. त्यासाठी ठरावीक अंतरावर आठ बाय दहा फूट अंतराचे डक्ट तयार करण्यात आले आहेत. नवीन जोडणी टाकणे, जुनी जोडणी बंद करणे, तांत्रिक अडथळा सोडविणे अशी कामे या 'डक्ट'मधून केली जातात. मात्र, अशी कामे करण्यापूर्वी ऑनलाइन माध्यमातून त्याचा कार्यारंभ आदेश काढला जातो, कोणत्या ठेकेदारामार्फत काम केले जाणार, हे निश्चित होते. त्यानंतर ते काम केले जाते. प्राधिकरण येथील घटनास्थळावरील 'डक्ट'मध्ये काम करण्याबाबत 'बीएसएनएल'कडे कोणताही कार्यारंभ आदेश नाही. त्यामुळे प्राथमिक तपासात कंपनीचा संबंध येत नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. दरम्यान, घटनास्थळी पोलिसांना दोन दुचाकी, टिकाव, दोन मोबाइल फोन व इतर साहित्य आढळले आहे.

मनोज आणि अमोल यांच्याबरोबर त्यांचे तीन मित्र होते. घटना घडल्यानंतर तिघेही बेपत्ता झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी पथक पाठवले आहे. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर दोन्ही कामगार 'डक्ट'मध्ये का उतरले होते, हे स्पष्ट होईल, असे निगडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी सांगितले.

### घटनास्थळी दोन दुचाकी

घटनास्थळी पोलिसांना दोन दुचाकी, टिकाव, दोन मोबाइल फोन आणि अन्य साहित्य आढळून आले आहे. मृत मजुरांसोबत असलेल्या तीन मित्रांचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे. त्यांची चौकशी झाल्यानंतर मनोज आणि अमोल डक्टमध्ये का उतरले होते, याबाबत महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

# आयटीयन्सना मोठा दिलासा; हिंजवडी मेट्रोतून थेट कंपन्यांमध्ये प्रवेश!

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोमुळे हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्क परिसरात काम करणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवास सुकर होणार आहे. मेट्रो स्थानकातून थेट कार्यालयात जाण्याची सुविधा आयटी कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पुढाकार घेतला असून, सध्या आयटी पार्कमध्ये पाच कंपन्यांकडून असा पादचारी उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव आहे.**



हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे उद्घाटन सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. आयटी कर्मचाऱ्यांसह पुणेकरांचा प्रवास या मेट्रो सेवेमुळे वेगवान होणार असून, त्यांची वाहतूककोंडीतून सुटका होणार आहे. हिंजवडी आयटी पार्कमधील मेट्रो मार्गावरील कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी नजीकच्या मेट्रो स्थानकातून पादचारी उड्डाणपूल उभारावा, असा प्रस्ताव 'एमआयडीसी'ने दिला आहे. या पादचारी उड्डाणपुलांमध्ये मेट्रो स्थानकातून कर्मचाऱ्यांना खाली रस्त्यावर उतरून कंपनीपर्यंत जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

त्यांना स्थानकातून थेट कंपनीत जाता येईल आणि कंपनीतून थेट स्थानकात येता येईल. मेट्रो मार्गावरील सर्व मोठ्या आयटी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांसाठी पादचारी उड्डाणपूल उभारावेत, यासाठी 'एमआयडीसी'चे प्रयत्न सुरू आहेत. या पादचारी उड्डाणपुलासाठी जागा 'एमआयडीसी'कडून उपलब्ध करून दिली जाणार आहे.

'मेट्रो स्थानकापासून पादचारी उड्डाणपूल उभारण्याच्या 'एमआयडीसी'च्या प्रस्तावाला इन्फोसिस आणि एम्बसी क्वाड्रन बिझनेस पार्कने होकार दर्शविला आहे. इन्फोसिस कंपनीकडून मेट्रो स्थानक चार व पाचला जोडणारे पादचारी उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. त्याच वेळी एम्बसी क्वाड्रन बिझनेस पार्ककडून मेट्रो स्थानक दोनला जोडणारा पादचारी उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. 'एमआयडीसी'ने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस), टेक महिंद्रा, बिर्लासॉफ्ट या कंपन्यांनाही अशा प्रकारचा प्रस्ताव दिला आहे. आयटी पार्कमधील कंपन्यांनी मेट्रो स्थानकापासून पादचारी उड्डाणपूल उभारल्यास सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे,' अशी माहिती 'एमआयडीसी'चे कार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी दिली.

### रस्त्यावरील गर्दी कमी होणार

आयटी कर्मचाऱ्यांना मेट्रो स्थानकातून थेट कंपनीत जाता-येता यावे, यासाठी पादचारी उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव आहे. याला अनेक कंपन्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे कर्मचारी घरून मेट्रोतून येतील आणि स्थानकातून थेट कंपनीत जातील. याचबरोबर घरी जातानाही ते कंपनीतून थेट स्थानकात जातील. या माध्यमातून कर्मचाऱ्यांची सोय होणार असून, रस्त्यावरील गर्दी कमी होण्यासही मदत होणार आहे. आयटी पार्कमधील सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांना याचा फायदा होईल, असे 'एमआयडीसी'चे कार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी सांगितले.



## भूमिका

**सार्वजनिक गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक आणि भव्य झाले आहे. मोठ्या मूर्ती, आकर्षक रोषणाई, विविध वाद्यवृंद, आगमन मिरवणुका आणि सोशल मीडियावरील प्रचारामुळे तरुणाईचा सहभाग वाढला आहे.**

# गणेशोत्सवात भव्यतेपेक्षा सुरक्षिततेला मान

या भव्यतेमुळे उत्सवाचे आकर्षण निश्चितच वाढते; मात्र त्याचबरोबर गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण आणि तांत्रिक सुरक्षेची जबाबदारीही वाढते. भूलेश्वर येथील घटनेने याच वास्तवाची गंभीर जाणीव करून दिली आहे.

मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात गणेशमूर्तींची वाहतूक करणे मोठे आव्हान आहे. अरुंद रस्ते, विजेच्या तारांचे जाळे, जुने पूल, सखल भाग आणि वाहतूक कोंडी यांचा विचार न करता उंच मूर्तींची मिरवणूक काढणे धोकादायक ठरू शकते. ट्रकची क्षमता, क्रेनची सुरक्षितता, मूर्तीची लोखंडी चौकट, वेल्डिंगची मजबुती आणि वजनाचा समतोल या तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उत्सवाच्या उत्साहात झालेली छोटीशी चूकही मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे प्रत्येक मंडळाने



मिरवणुकीपूर्वी तांत्रिक तपासणीला प्राधान्य दिले पाहिजे.

मूर्तीच्या उंचीबाबतही आता व्यापक आणि व्यवहार्य चर्चा होणे आवश्यक आहे. केवळ भव्यतेसाठी मूर्तीची उंची वाढविण्याऐवजी परिसराची रचना, रस्त्यांची रुंदी, मंडपाची उंची आणि वाहतुकीच्या मार्गांचा विचार केला पाहिजे. मूर्तीची उंची किती असावी, याचा निर्णय कोणत्याही एका संस्थेने लादण्याऐवजी शासन, महानगरपालिका, गणेश मंडळांचे प्रतिनिधी आणि तांत्रिक तज्ज्ञ यांच्या समन्वयातून घेतला पाहिजे. परंपरा आणि श्रद्धेला धक्का न लावता सार्वजनिक सुरक्षिततेचा समतोल साधणे हाच यामागचा उद्देश असला पाहिजे.

उत्सवाचा आनंद आणि नागरिकांची सुरक्षितता या परस्परविरोधी बाबी नाहीत. उलट, सुरक्षित वातावरणातच उत्सवाचा आनंद अधिक खुलतो. त्यामुळे मोठ्या मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रशिक्षित स्वयंसेवक, प्रथमोपचार केंद्र, पिण्याचे पाणी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष नियोजन करणेही गरजेचे आहे. मिरवणुकीत क्रेन किंवा अवजड उपकरणांचा वापर करताना त्यांची क्षमता आणि स्थिती तपासणे आवश्यक आहे. ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन करणे हीदेखील मंडळांची जबाबदारी आहे. उत्सवाचा सांस्कृतिक गाभा जपत ढोल-ताशा, लेझीम आणि पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन देता येईल. प्रशासनानेही रस्ते खड्डेमुक्त करणे, धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे, विद्युत तारांची तपासणी करणे आणि विसर्जनस्थळी आवश्यक सुरक्षा व्यवस्था करणे गरजेचे आहे.

गणेशोत्सवाची खरी भव्यता केवळ मूर्तीच्या उंचीत, रोषणाईत किंवा मिरवणुकीच्या थाटात नसते; ती शिस्त, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि सुरक्षिततेत असते. भूलेश्वरची घटना ही दोषारोपासाठी नव्हे, तर भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठीचा इशारा मानला पाहिजे. उत्सवाची परंपरा आणि श्रद्धा जपत आधुनिक सुरक्षेची सांगड घालणे हीच काळाची गरज आहे. भव्यता उत्सवाचे आकर्षण वाढवते; पण सुरक्षितता त्याला अर्थ देते. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात प्रत्येक मंडळाने एकच मंत्र लक्षात ठेवावा—उत्सव मोठा असावा, पण त्याहून मोठी असावी नागरिकांची सुरक्षितता!

## प्रासंगिक »

### योग्य निर्णयाचे महत्त्व

**एका जंगलात एक ससा राहत होता. तो खूप चपळ होता; पण घाईघाईने निर्णय घेण्याची त्याला सवय होती. एकदा जंगलात वादळ येणार असल्याची बातमी पसरली.**

सर्व प्राणी सुरक्षित ठिकाणी जाण्याची तयारी करू लागले. सशाने मात्र, "मी वेगाने धावू शकतो, मला कशाचीच भीती नाही," असे म्हणत इतरांची थट्टा केली.

थोड्याच वेळात जोरदार वारा सुरू झाला. झाडांच्या फांद्या तुटून पडू लागल्या. ससा घाबरला आणि सुरक्षित जागा शोधू लागला. त्याला एक कासव दिसले. कासवाने आधीच मजबूत झाडाच्या मुळाशी आसरा तयार केला होता. त्याने सशालाही आत घेतले.

वादळ शांत झाल्यावर सशाला आपली चूक समजली. त्याने कासवाचे आभार मानले आणि म्हणाला, "वेग असणे चांगले, पण संकटाच्या वेळी योग्य निर्णय घेणे त्याहून महत्त्वाचे आहे."

त्या दिवसापासून सशाने घाईने निर्णय घेणे सोडले.

- तात्पर्य : संकटाच्या वेळी घाई नव्हे, तर विचारपूर्वक घेतलेला निर्णयच आपले रक्षण करतो.

अमेरिकेने स्थलांतर आणि व्हिसा धोरण अधिक कठोर करण्यास सुरुवात केली आहे. एच-१बी व्हिसावरील निर्बंधांनंतर आता बी-१ आणि बी-२ व्हिसाधारकांवरही कारवाईची शक्यता व्यक्त होत आहे.

## अमेरिकेत प्रवेश सोपा, मुक्काम मात्र कठीण!

पर्यटक किंवा व्यावसायिक व्हिसावर अमेरिकेत प्रवेश करून त्यानंतर आश्रय मागणाऱ्या नागरिकांवर प्रशासनाचे विशेष लक्ष असल्याचे समोर आले आहे. सुमारे दोन लाख परदेशी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्याच्या तयारीची बातमी त्यामुळेच महत्त्वाची ठरते. हा केवळ व्हिसाचा प्रश्न नसून अमेरिकेच्या बदलत्या स्थलांतर धोरणाचा व्यापक संकेत आहे.

बी-१ व्हिसा व्यवसाय, बैठका आणि व्यावसायिक कारणांसाठी, तर बी-२ व्हिसा पर्यटन, नातेवाइकांना भेटणे किंवा वैद्यकीय उपचारांसाठी दिला जातो. या व्हिसाचा उद्देश स्पष्ट असताना त्याचा वापर करून अमेरिकेत दीर्घकाळ राहण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्यावर नियंत्रण आणण्याचा अमेरिकेचा अधिकार आहे. मात्र, कारवाई करताना सर्व प्रकरणांकडे एकाच नजरेने पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक व्यक्तीची परिस्थिती, आश्रय अर्जाचे कारण आणि त्याची कायदेशीर स्थिती यांचा स्वतंत्र विचार होणे आवश्यक आहे.

व्हिसा रद्द होणे आणि तात्काळ हद्दपार होणे या दोन वेगळ्या प्रक्रिया आहेत, हेही नागरिकांनी समजून




घेणे गरजेचे आहे. एखाद्या व्यक्तीचा आश्रय अर्ज न्यायप्रक्रियेत असेल, तर त्याला संबंधित कायद्यांनुसार काही काळ अमेरिकेत राहण्याची परवानगी मिळू शकते. त्यामुळे केवळ व्हिसा रद्द झाल्याच्या बातमीवरून सर्व संबंधितांना तत्काळ देशाबाहेर काढले जाईल, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. अमेरिकेच्या कठोर धोरणाचा सर्वाधिक परिणाम भारतीयांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतातून दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी, व्यावसायिक, पर्यटक आणि कर्मचारी अमेरिकेत जातात. त्यामुळे व्हिसा प्रक्रियेत पारदर्शकता, कागदपत्रांची अचूकता आणि नियमांचे पालन यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांनी व्हिसाचा उद्देश आणि त्यासंबंधीच्या अटींचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

एच-१बी व्हिसाच्या शुल्कात प्रस्तावित मोठी वाढ हीदेखील चिंतेची बाब आहे. परदेशी कर्मचाऱ्यांवरील आर्थिक भार वाढल्यास त्याचा परिणाम कंपन्यांच्या नियुक्ती धोरणावर आणि कुशल मनुष्यबळाच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहावर होऊ शकतो. अमेरिकेला आपल्या देशाच्या हिताचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे; मात्र त्याचवेळी जागतिक उद्योग, संशोधन आणि कौशल्यविकासासाठी परदेशी मनुष्यबळाचे योगदानही दुर्लक्षित करता येणार नाही. कठोर नियम हे प्रशासनासाठी आवश्यक साधन असू शकतात; परंतु त्यांची अंमलबजावणी न्याय्य, पारदर्शक आणि परिस्थितीनुरूप असणे अधिक महत्त्वाचे आहे. अमेरिकेने सुरक्षेबरोबरच मानवी हक्क आणि कायदेशीर प्रक्रियेचा समतोल राखला, तरच या धोरणाला व्यापक स्वीकार मिळेल. अन्यथा व्हिसा धोरणातील कठोरता ही केवळ स्थलांतर नियंत्रण न राहता आंतरराष्ट्रीय संबंधांवरही परिणाम करणारी बाब ठरू शकते.

## ॥ अभंगवाणी ॥



स्मशान ते भूमि प्रेतरूप जन।
सेवाभक्तिहीन ग्रामवासी ॥१॥

भरतील पोट श्वानाचिया परी।
वस्ति दिली घरीं यमदूतां ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नेपाळमध्ये ४०४ महाराष्ट्रीय सुरक्षित!

## ४५ पर्यटकांचा भारतीय हद्दीत प्रवेश; ३३८ जणांशी संपर्क

**महाईन्यूज । मुंबई**

**नेपाळमधील महापुरामुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य शासनाकडून विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील ४०४ नागरिक सुरक्षित असून ३३८ जणांशी संपर्क झाला आहे. सर्व नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी योग्य नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत.**



महाराष्ट्रातील ४५ पर्यटकांच्या गटाने शनिवारी भारतीय हद्दीत प्रवेश केला. संगमनेर येथील ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून नाशिक, पुणे, मुंबई आणि अहिल्यानगरमधील नागरिक नेपाळला गेले होते. महापुराच्या काळात हा गट चितवन येथे होता. काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्याने लुंबिनीमार्गे त्यांना भारतात आणण्यात आले. हे पर्यटक अयोध्येत पोहोचल्यानंतर शासनाच्या सूचनेनुसार त्यांच्या पुढील प्रवासाचे नियोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, नेपाळमधील आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी कोल्हापुरातील व्हाइट आर्मीची मेडिकल आणि रिलीफ टीम शुक्रवारी रात्री नेपाळकडे रवाना झाली. उज्ज्वल नागेशकर यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर आणि स्वयंसेवकांचा या पथकात समावेश आहे. पूरग्रस्तांना वैद्यकीय उपचार आणि आवश्यक मदत पुरविण्याचे काम हे पथक करणार आहे. एस्टर आधार हॉस्पिटलने मोहिमेसाठी औषधसाहित्य उपलब्ध करून दिले असून, त्याचा सुमारे पाच हजार नागरिकांना लाभ होण्याची शक्यता आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने चीनमार्गे नेपाळमध्ये सुरक्षितपणे प्रवेश केलेल्या १४९ भारतीय पर्यटकांची यादी राज्यांना पाठवली आहे. संबंधित नागरिकांना त्यांच्या जिल्ह्यांमध्ये सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्रातील नागरिकांची माहिती आणि नावे निश्चित करण्याचे काम प्रशासनाकडून केले जात आहे.

नागपूरचे १०६ पर्यटक बिहारमार्गे नागपूरच्या दिशेने परतीच्या प्रवासाला लागले आहेत. मुंबईतील बोरीवली आणि अंधेरी येथील आठ पर्यटक अद्याप नेपाळमध्ये अडकले असून, त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अंधेरी येथील लक्ष्मीनारायण आचार्य यांच्याकडून माहिती घेण्याचाही प्रयत्न केला जात आहे.

### ४५ पर्यटक भारतात दाखल

नेपाळमधील चितवन येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील ४५ पर्यटकांनी शनिवारी लुंबिनीमार्गे भारतीय हद्दीत प्रवेश केला. हे सर्व पर्यटक अयोध्येत पोहोचल्यानंतर पुढील प्रवासाचे नियोजन करण्यात येणार आहे.

## २०१० पासूनच्या नियुक्त्या रडारवर; शालार्थ घोटाळ्याची फॉरेन्सिक चौकशी

**महाईन्यूज । नाशिक**

**शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास आता अधिक व्यापक करण्यात येणार असून, २०१० पासूनच्या संशयित नियुक्त्या, वैयक्तिक मान्यता, रोस्टर, संचमान्यता आणि संबंधित कार्यालयीन फाईलींची फॉरेन्सिक तपासणी करण्याचा निर्णय विशेष तपास पथकाने (एसआयटी) घेतला आहे. केवळ बोगस शालार्थ आयडी आणि वेतन बिलांच्या पडताळणीपुरता तपास मर्यादित न ठेवता डिजिटल आणि कागदपत्रांवरील पुरावे शास्त्रीय पद्धतीने तपासले जाणार आहेत.**



बनावट शालार्थ आयडी प्रकरणात शिक्षण विभागातील काही अधिकारी-कर्मचारी आणि शैक्षणिक संस्थांच्या संस्थाचालकांनी संगनमत करून शासनाची सुमारे १६० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील पुरावे अधिक ठोस करण्यासाठी एसआयटीकडून वैज्ञानिक आणि तांत्रिक पद्धतीने तपास सुरू आहे.

दोन दिवसांपूर्वी एसआयटीच्या पथकाने जळगाव जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकाऱ्यांकडे जाऊन संबंधित फाईलींची तपासणी केली. धुळे आणि नाशिक जिल्हा परिषदांमधील जुन्या नोंदींचीही अशाच पद्धतीने तपासणी होण्याची शक्यता आहे. या फेरतपासणीत घोटाळ्याची अनेक वर्षांपासूनची संभाव्य साखळी उघड होण्याची शक्यता आहे.

मान्यता देताना संबंधित अधिकाऱ्याने मूळ कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी केली होती का, याचाही तपास होणार आहे. मान्यता आदेशावरील स्वाक्षरीची फॉरेन्सिक तपासणी केल्यास बनावट कागदपत्रे किंवा प्रक्रियेतील गैरप्रकार स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

उदय विष्णू पंचभाई, राजमोहन शालिग्राम पाटील, मनिष शालिग्राम पाटील, अविनाश पाटील, उमेश धनराज पवार, अतुल संदीपराव पवार आणि प्रदीप रामचंद्र शिंगाणे हे संशयित अद्याप फरार आहेत. त्यांना महिनाभरात अटक करून न्यायालयासमोर हजर करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. संशयित नितीन उपासनी आणि राहुल पाटील यांना पुन्हा चौकशीसाठी हजर करण्यासाठी कारागृह प्रशासनाला प्रॉडक्शन वॉरंट बजावण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

### फरार संशयितांना महिनाभरात हजर करण्याचे आदेश

दरम्यान, बनावट शालार्थ आयडी प्रकरणातील दोषारोपपत्र अतिरिक्त सत्र न्यायालयात वर्ग करण्यात आले आहे. नाशिकरोड न्यायालयातून प्रकरण कमिट होऊन अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. जी. जोशी यांच्या न्यायालयात दाखल झाले आहे. शनिवारी झालेल्या सुनावणीत पुढील तारीख २८ सप्टेंबर निश्चित करण्यात आली असून, त्या दिवशी फरार संशयितांना न्यायालयासमोर हजर करण्याचे आदेश देण्यात आले.

### नियुक्तीपासून शालार्थ आयडीपर्यंत तपास


नाशिक विभागातील प्रकरणात संबंधित कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपासून शालार्थ आयडी मिळेपर्यंतच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. नियुक्तीच्या वेळी संबंधित पद प्रत्यक्षात अस्तित्वात होते का, रोस्टरनुसार ते पद उपलब्ध होते का, संचमान्यतेत त्याची तरतूद होती का आणि नियुक्ती व मान्यता प्रक्रिया नियमानुसार झाली होती का, याचीही तपासणी केली जात आहे.

# मोदींच्या उझबेकिस्तान दौऱ्यात युरेनियम चर्चा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान

**महाईन्यूज । उझबेकिस्तान**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांच्यात ताश्कंद येथे रविवारी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत नागरी अणुऊर्जेसाठी दीर्घकालीन युरेनियम पुरवठा, डिजिटल तंत्रज्ञान, संरक्षण आणि खाणकाम यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमधील सहकार्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच २०३० पर्यंत परस्पर व्यापार ५ अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्टही दोन्ही देशांनी निश्चित केले आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दोन दिवसीय उझबेकिस्तान दौऱ्यादरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, व्यापार, पायाभूत सुविधा, दुर्मिळ खनिजे, संरक्षण आणि सुरक्षा, इनोव्हेशन, कृषी, औषधनिर्माण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान आणि 'यूपीआय'सह डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या क्षेत्रांतील सहकार्याचा दोन्ही नेत्यांनी आढावा घेतला.

या बैठकीनंतर खाणकाम, संस्कृती, शिक्षण, पर्यटन आणि आयुर्वेद यांसह विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. उझबेकिस्तानमधील 'फयाज तेपा' आणि 'कारा तेपा' या बौद्ध वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करण्याबाबतच्या सहकार्य कराराचाही यात समावेश आहे.

पंतप्रधान मोदी यांनी ताश्कंदमधील 'यांगी उझबेकिस्तान' स्मारकाला भेट देऊन पुष्पचक्र अर्पण केले. तसेच तेथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष योग प्रात्यक्षिक कार्यक्रमालाही त्यांनी उपस्थिती लावली. ताश्कंदमधील द्विपक्षीय चर्चा आटोपल्यानंतर पंतप्रधान मोदी ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान बिश्केक येथे होणाऱ्या 'शांघाय सहकार्य संघटने'च्या शिखर परिषदेसाठी रवाना होणार आहेत. भारत आणि उझबेकिस्तानमधील आर्थिक व सामरिक संबंध अधिक दृढ करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. दोन्ही देशांनी भविष्यातील सहकार्याच्या नव्या संधी शोधण्यासह परस्पर संबंधांना नवी दिशा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

### दीर्घकालीन युरेनियम पुरवठ्यावर भर

भारतातील नागरी अणुऊर्जा प्रकल्पांची गरज भागवण्यासाठी उझबेकिस्तानकडून दीर्घकालीन युरेनियम खरेदीचा मार्ग सुकर करण्यावर या बैठकीत एकमत झाले. पंतप्रधान मोदी म्हणाले, "भारत आणि उझबेकिस्तान यांच्यातील धोरणात्मक भागीदारीला १५ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर उभय देशांचे संबंध अधिक भक्कम टप्प्यावर नेले जात आहेत. सहकार्याला योग्य दिशा देण्यासाठी परराष्ट्र मंत्र्यांच्या स्तरावर 'समन्वय परिषद' स्थापन केली जाईल. तसेच दोन्ही देशांमधील संयुक्त आयोगाचा दर्जा सचिव स्तरावरून थेट मंत्री स्तरावर वाढवला जाईल."

### पंतप्रधान मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान

दौऱ्यादरम्यान राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांच्या हस्ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ऑर्डर ऑफ ऑलीय दरजाली दोस्तलिक' प्रदान करून गौरविण्यात आले. मोदी यांना मिळालेला हा ३६ वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे. हा पुरस्कार स्वीकारताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "'दोस्तलिक' या शब्दाचा अर्थ मैत्री असा होतो. हा सन्मान म्हणजे भारत आणि उझबेकिस्तान यांच्यातील ऐतिहासिक आणि दृढ मैत्रीचे प्रतीक आहे. हा माझा वैयक्तिक नसून १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे."

# 'अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर नीट पेपरफुटीविरोधात मोठे आंदोलन केले होते. यानंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा ही द्यावा लागला होता. याच आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी २६ दिवस उपोषण केले होते.**



NEET पेपरफुटीविरोधात दिल्लीतील जंतर-मंतरवर झालेल्या आंदोलनानंतर चर्चेत आलेले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आता कॉक्रोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. "अभिजीत दिपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत, मी त्यांचं खूप जवळून निरीक्षण केलं आहे," असा खुलासा वांगचुक यांनी केला आहे.

'PGX RAW & REAL' या युट्यूब चॅनेलला दिलेल्या विशेष मुलाखतीत सोनम वांगचुक बोलत होते. दिल्लीतील आंदोलनात वांगचुक यांनी सलग २६ दिवस उपोषण केलं होतं. या आंदोलनाचे पडसाद देशभरात उमटले होते आणि अखेर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला होता.

जंतर-मंतरवरील उपोषणाच्या काळातील आठवण सांगताना वांगचुक म्हणाले, "मी जितका वेळ त्यांच्यासोबत आंदोलनात घालवला, तितक्या वेळ मी त्यांना एकच सल्ला दिला होता, या आंदोलनाला अजिबात राजकीय स्वरूप देऊ नका. आंदोलनाची पवित्रता कायम राहिली तरच जनतेचा विश्वास टिकून राहतो. तुम्हाला पुढे जाऊन राजकारण करायचं असेल तर नक्की करा, पण सध्याच्या आंदोलनाला त्यापासून दूर ठेवा." माझ्या या सल्ल्याचा मान राखत त्यांनी हे आंदोलन पूर्णपणे अराजकीय ठेवले, याबद्दल वांगचुक यांनी समाधान व्यक्त केले. राजकीय महत्त्वाकांक्षा असणं ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. कधीकधी मी अतिविचार करतो आणि मला वाटतं की आंदोलनात असणाऱ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा नसाव्यात. तरीही मी त्यांना दोष देणार नाही. उलट ते अभ्यासू आणि चांगली माणसं आहेत.

### राजकीय महत्त्वाकांक्षा असण्यात काही चुकीचं नाही

मुलाखतीत बोलताना वांगचुक म्हणाले, "अभिजीत दिपके, आशुतोष आणि सौरव यांना राजकीय पार्श्वभूमी आहे. त्यांनी भूतकाळात आम आदमी पार्टीसाठी काम केलं आहे. अनेक लोक मला विचारतात की यांच्या काही राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत का? मला स्वतःला असं वाटतं की, होय, त्यांच्या नक्कीच राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत. मी त्यांचं खूप निरीक्षण केलं आहे. पण यामध्ये काही चुकीचं किंवा वावगं आहे असं मला वाटत नाही."

# माधुरी दीक्षित म्हणून पहिल्यांदाच प्रेक्षकांसमोर येण्याची संधी..!



मराठीतील लोकप्रिय प्रश्नमंजूषा कार्यक्रम 'कोण होणार करोडपती' आपल्या आठव्या पर्वासह पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. यंदाच्या पर्वाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी लोकप्रिय अभिनेत्री माधुरी दीक्षित स्वीकारणार आहे. त्यामुळे पहिल्यांदाच माधुरीला अभिनयाव्यतिरिक्त एका वेगळ्या भूमिकेतून मराठी प्रेक्षकांशी थेट संवाद साधताना पाहायला मिळणार आहे. 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमाची सुरुवात २०१३ मध्ये ईटीव्ही मराठीवर झाली. पहिल्या पर्वापासून अभिनेते सचिन खेडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यानंतर अभिनेता स्वप्नील जोशी आणि दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनीही वेगवेगळ्या पर्वांची सूत्रे सांभाळली. आता आठव्या पर्वासाठी सोनी मराठीने माधुरी दीक्षितची निवड करत प्रेक्षकांना खास सरप्राइज दिले आहे. दरम्यान, विषयी बोलताना माधुरीने सांगितले की, चित्रपटांमध्ये काम करताना कलाकार नेहमी एखाद्या व्यक्तिरेखेतून प्रेक्षकांसमोर येतो. मात्र, 'कोण होणार करोडपती'मध्ये ती कोणतीही व्यक्तिरेखा साकारणार नसून 'माधुरी दीक्षित' म्हणूनच स्पर्धक आणि प्रेक्षकांशी संवाद साधणार आहे. त्यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व, उत्स्फूर्तपणा आणि अभिनयापलीकडची बाजू प्रेक्षकांना पाहायला मिळेल. या कार्यक्रमाला केवळ प्रश्नोत्तरांचा खेळ न मानता प्रत्येक स्पर्धकाची कथा जाणून घेण्याची संधी म्हणून माधुरी पाहते.

# तारा सुतारियाची गंभीर आजाराशी झुंज.!



गणित विषय अनेकांना कठीण वाटतो. मात्र गणितात अडचण येणे आणि डिस्कॅल्क्युलिया असणे या वेगळ्या गोष्टी आहेत. अभिनेत्री तारा सुतारियाने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत आपल्याला गणिताशी संबंधित शिकण्याची अडचण, म्हणजेच डिस्कॅल्क्युलिया असल्याचे सांगितले. आर्थिक व्यवहार आणि हिशोबाच्या बाबतीत तिचे वडील तसेच अकाउंट्स टीम तिला मदत करत असल्याचेही तिने सांगितले. डिस्कॅल्क्युलिया हा एक विशिष्ट शिकण्याचा विकार (Specific Learning Disorder) आहे. यामध्ये व्यक्तीला संख्या, गणिती चिन्हे, मोजणी आणि गणिती संकल्पना समजून घेणे, लक्षात ठेवणे किंवा त्यांचा वापर करणे कठीण जाऊ शकते. याला अनौपचारिकपणे 'मॅथ डिस्लेक्सिया' असेही म्हटले जाते. मात्र याचा अर्थ व्यक्तीची बुद्धिमत्ता कमी आहे असा अजिबात होत नाही. डिस्कॅल्क्युलियासाठी एकच औषधोपचार नाही. मात्र लवकर ओळख, विशेष शैक्षणिक पद्धती, सराव आणि तज्ज्ञांची मदत यामुळे अडचणींचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम कमी करता येतो. मुलाला गणितात अडचण असल्यास त्याला दोष न देता तज्ज्ञांकडून योग्य मूल्यांकन करून घेणे महत्त्वाचे आहे.

# 'हनुमान अंश'चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ; कोटींचा पाऊस




सध्या बॉक्स ऑफिसवर अनेक मोठे चित्रपट प्रदर्शित झाले असले, तरी कमी बजेटमध्ये बनलेल्या 'हनुमान अंश' या चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुरुवातीला अत्यंत संथ कमाई करणाऱ्या या सिनेमाने आता बॉक्स ऑफिसवर जबरदस्त वेग पकडला आहे. अवघ्या 1.8 ते 2 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने आतापर्यंत तब्बल 32 कोटी रुपयांच्या आसपास व्यवसाय केल्याचे सांगितले जात आहे. 31 जुलै रोजी प्रदर्शित झालेल्या 'हनुमान अंश'ला रिलीजच्या सुरुवातीला फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. मात्र, तिसऱ्या आठवड्यात चित्रपटाच्या कमाईने अचानक मोठी झेप घेतली. विशेष म्हणजे चित्रपटाच्या गाण्यांनाही सोशल मीडियावर चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रसिद्ध संत नीम करौली बाबा यांच्या जीवनावर आणि त्यांच्या चमत्कारी शक्तींवर आधारित हा चित्रपट असल्याचे सांगितले जात आहे. उपलब्ध बॉक्स ऑफिस आकडेवारीनुसार, 'हनुमान अंश'ने शनिवारी म्हणजेच 23व्या दिवशी 9.25 कोटी रुपयांची कमाई केली. या दिवशी चित्रपटाचे 4,137 शो बुक झाले होते, तर थिएटरमधील ऑक्युपन्सी सुमारे 53 टक्के राहिली. विशेष म्हणजे मागील दिवसाच्या तुलनेत शनिवारी चित्रपटाच्या कमाईत तब्बल 48 टक्क्यांची वाढ झाली. शुक्रवारी चित्रपटाने 6.25 कोटी रुपये कमावले होते. शनिवारी त्यात मोठी वाढ होत कमाई 9.25 कोटींवर पोहोचली. भारतातील चित्रपटाचे नेट कलेक्शन 27.38 कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. कमी बजेटच्या तुलनेत ही कमाई अनेक पटींनी अधिक असल्याने चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. 'हनुमान अंश'च्या बॉक्स ऑफिस प्रवासाकडे पाहिल्यास चित्रपटाची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली होती. पहिल्या दिवशी सिनेमाने केवळ 10 लाख रुपये, दुसऱ्या दिवशी 20 लाख रुपये आणि तिसऱ्या दिवशी 30 लाख रुपयांची कमाई केली. रिलीजच्या पहिल्या 16 दिवसांपर्यंत चित्रपटाला मोठी कमाई करता आली नाही. कधी 5 ते 10 लाख, तर कधी 85 लाख रुपयांपर्यंतच चित्रपटाची कमाई मर्यादित राहिली. मात्र, 17व्या दिवशी चित्रपटाने पहिल्यांदा कोटींचा आकडा ओलांडला. 17व्या दिवशी 2.20 कोटी रुपये कमावल्यानंतर चित्रपटाने मागे वळून पाहिले नाही. 18व्या दिवशी 1.25 कोटी, 19व्या दिवशी 2.35 कोटी आणि 20व्या दिवशी 1.50 कोटी रुपयांची कमाई झाली. यानंतर 21व्या दिवशी 2.10 कोटी, 22व्या दिवशी 6.25 कोटी आणि 23व्या दिवशी थेट 9.25 कोटी रुपयांचा व्यवसाय करण्यात चित्रपटाला यश आले.

# गंभीर-गिल जोडीचा नवा 'मास्टरप्लॅन'

## मधल्या फळीत हवी अष्टपैलू ताकद, तिलक वर्मावर मोठी जबाबदारी

**महाईन्यूज । मुंबई**

**वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेदरम्यान आशियाई क्रीडा स्पर्धाही पार पडणार असल्याने भारतीय संघातील अनेक प्रमुख खेळाडू या मालिकेसाठी अनुपलब्ध राहतील. त्यामुळे पुढील वर्षी दक्षिण आफ्रिकेत रंगणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाची प्रत्यक्ष तयारी भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यापासून सुरू करणार आहे. भारतीय संघ व्यवस्थापनाचे संपूर्ण लक्ष आता मधल्या फळीत सक्षम पर्याय (बॅकअप) तयार करण्यावर केंद्रित झाले असून, या रणनीतीचा भाग म्हणून युवा फलंदाज तिलक वर्माकडे श्रेयस अय्यरचा भक्कम पर्याय म्हणून पाहिले जात आहे.**



'टाइम्स ऑफ इंडिया'च्या वृत्तानुसार, डावखुरा फलंदाज असल्यामुळे तिलक वर्माच्या समावेशाने भारताच्या फलंदाजी फळीत वैविध्य निर्माण होईल; कारण सध्याच्या संघात प्रामुख्याने उजव्या हाताच्या फलंदाजांचे प्राबल्य आहे. याशिवाय तिलकला त्याच्या गोलंदाजीवरही विशेष लक्ष देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. त्याच्या 'ऑफ-ब्रेक' गोलंदाजीत उत्तम क्षमता असल्याचे मानले जात आहे. वस्तुतः अव्वल फळीतील फलंदाजांमध्ये गोलंदाजीच्या पर्यायांची वानवा असल्याने खालच्या फळीवर आणि मुख्य गोलंदाजांवर सातत्याने अतिरिक्त ताण येत असल्याचे संघ व्यवस्थापनाने अधोरेखित केले आहे. विश्वचषकादरम्यान दक्षिण आफ्रिकेतील वेगवान व उसळत्या खेळपट्ट्यांच्या आव्हानासाठी संघाला आतापासूनच सज्ज राहावे लागणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त झाला होता, शिवाय वेग आणि उसळीविरुद्ध त्याची अद्याप म्हणावी तशी कठोर परीक्षा झालेली नाही. दुसरीकडे संघात आधीपासूनच रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या रूपाने दोन ज्येष्ठ खेळाडू असून, त्यांनाही वारंवार शारीरिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विश्वचषकापर्यंत लोकेश राहुल ३५ वर्षांहून अधिक वयाचा होईल, तर रवींद्र जडेजाच्या निवडीबाबतही शाश्वती नाही. या वाढत्या वयामुळे व तंदुरुस्तीच्या अडचणींमुळे संघाच्या क्षेत्ररक्षणाचा दर्जाही खालावला आहे. त्यामुळेच भविष्याचा वेध घेत युवा खेळाडूंचा राखीव संच तयार करणे संघ व्यवस्थापनाला अत्यावश्यक वाटते. निवड समिती खेळाडूंना त्यांच्या मूळ फलंदाजीच्या स्थानावरच संधी देण्याच्या मतावर ठाम आहे. गेल्या वर्षी ऋतुराज गायकवाडला चौथ्या क्रमांकावर खेळवण्यात आले होते.

### मधल्या फळीसाठी पर्याय नाही

बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांच्या मते सद्यस्थितीत मधल्या फळीसाठी पुरेसे राखीव पर्याय उपलब्ध नाहीत. हार्दिक पांड्या आणि नितीश कुमार रेड्डी यांच्या वारंवार दुखापतग्रस्त होण्याच्या शक्यता लक्षात घेता, अव्वल फळीत असा खेळाडू असावा जो एकदिवसीय सामन्यात किमान चार षटके सहज टाकू शकेल. गेल्या वर्षभरात अंतिम अकरा खेळाडूंमध्ये संतुलन राखण्यासाठी संघ व्यवस्थापनाला वॉशिंग्टन सुंदर किंवा अक्षर पटेल यांना पाचव्या अथवा सहाव्या क्रमांकावर खेळवण्याची तडजोड करावी लागली आहे.

## क्रिकेटपटू मोहम्मद आमीर आता 'ब्रिटिश नागरिक'; पाकिस्तानचा अध्याय संपला

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज मोहम्मद आमीर याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपल्या पुनरागमनाच्या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. पाकिस्तान संघातील पुनरागमनाचे दरवाजे आता आपल्यासाठी पूर्णपणे बंद झाल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. पत्नीमार्फत आमीरला ब्रिटनचे नागरिकत्व आणि ब्रिटिश पासपोर्ट मिळाला आहे.**



क्रिकेट युट्यूब चॅनेल 'फुरकान भट्टी'ला दिलेल्या मुलाखतीत आमीर म्हणाला, "मी आता ब्रिटिश नागरिक आहे. जेव्हा तुम्ही काउंटी चॅम्पियनशिप किंवा 'द हंड्रेड' सारख्या स्पर्धांमध्ये स्थानिक खेळाडू म्हणून खेळता, तेव्हा तुम्हाला एका करारावर स्वाक्षरी करावी लागते, ज्यानुसार तुम्ही दुसऱ्या देशाकडून स्थानिक खेळाडू म्हणून खेळू शकत नाही. त्यामुळे माझं पाकिस्तानचं प्रकरण आता कायमचं बंद झालं आहे."

आमीरने पाकिस्तानकडून तीन विश्वचषक स्पर्धेत प्रतिनिधित्व केले होते. आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत त्याने ३६ कसोटी सामन्यांमध्ये ११९ विकेत, ६१ वनडे सामन्यात ८१ विकेट तर ६२ टी-२० सामन्यात ७१ विकेट घेतल्या आहेत. २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकात तो १७ बळी घेत पाकिस्तानचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला होता.पाकिस्तानने जिंकलेल्या २००९ च्या टी-२० विश्वचषक आणि २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयात आमीरने मोलाची भूमिका बजावली होती. याशिवाय २०१९ च्या विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्याने ५ विकेट घेतल्या होत्या.

जेव्हा तुम्ही काउंटी चॅम्पियनशिप किंवा 'द हंड्रेड' सारख्या स्पर्धांमध्ये स्थानिक खेळाडू म्हणून खेळता, तेव्हा तुम्हाला एका करारावर स्वाक्षरी करावी लागते, ज्यानुसार तुम्ही दुसऱ्या देशाकडून स्थानिक खेळाडू म्हणून खेळू शकत नाही.

### आता मी 'पाकिस्तानी स्थानिक खेळाडू' नाही

आपल्या या नव्या स्टेटसमुळे आता काउंटी चॅम्पियनशिप आणि 'द हंड्रेड' सारख्या स्पर्धांमध्ये आपली गणना 'पाकिस्तानी स्थानिक खेळाडू' म्हणून होऊ शकत नाही, असे आमीरने स्पष्ट केले आहे. इंग्लंडच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्थानिक खेळाडू म्हणून नोंदणी करताना खेळाडूंना दुसऱ्या कोणत्याही देशाकडून स्थानिक खेळाडू म्हणून खेळणार नाही, अशा करारावर स्वाक्षरी करावी लागते. क्रिकेट युट्यूब चॅनेल 'फुरकान भट्टी'ला दिलेल्या मुलाखतीत आमीर म्हणाला, "मी आता ब्रिटिश नागरिक आहे. त्यामुळे माझं पाकिस्तानचं प्रकरण आता कायमचं बंद झालं आहे."

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।
दि. 31 ऑगस्ट 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





# नवी सांगवीला शाफ्ट, जुन्या सांगवीला डावलता?

## ‘टेल एंड’मुळे उंचवट्यावरील भागात पाणीटंचाई; पाण्यासाठी नागरिकांचा संतप्त सवाल

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिण्याच्या पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यासाठी नव्या सांगवीच्या धर्तीवर जुनी सांगवीतही 'व्हर्टिकल शाफ्ट पंपिंग सिस्टीम' तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे. जुनी सांगवी हा पाण्याचा 'टेल एंड' (शेवटचा भाग) असल्यामुळे येथे पाणीपुरवठ्याचे गणित पूर्णपणे कोलमडले आहे. जय मल्हारनगर, ममतानगर, बुद्ध सोसायटी, मधुबन असो किंवा संगमनगर, प्रियदर्शनीनगर, साई स्नेह पार्क आणि जयराज पार्क यांसारख्या भागांमध्ये पाण्याचा प्रचंड प्रश्न आहे. या संपूर्ण परिसराची भौगोलिक रचना पाहता, येथील बहुतांश सोसायट्या आणि वास्तू या उंचवट्यावर वसलेल्या आहेत.**

नव्या सांगवीत स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सुमारे एक कोटी रुपये खर्च करून व्हर्टिकल शाफ्टची प्रक्रिया राबवली आणि प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी ट्रायलही घेतली जात आहे. मग असाच प्रभावी उपाय जुन्या सांगवीसाठी का राबवला जात नाही? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. त्यामुळे प्रशासनाने दुजाभाव न करता जुन्या सांगवीतील उंचवट्यावरील भाग आणि 'टेल एंड'चा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तातडीने येथे 'व्हर्टिकल शाफ्ट' प्रकल्प उभा करावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

जुन्या सांगवीतील ज्या सोसायट्या उंच भागावर आहेत, तिथे गुरुत्वाकर्षणामुळे पाण्याचा फोर्स फार कमी होतो किंवा पाणी पोहोचतच नाही. अशा वेळी व्हर्टिकल शाफ्टमध्ये बसवलेले व्हर्टिकल टर्बाइन पंप प्रचंड दाब निर्माण करून पाणी सरळ वरच्या दिशेने ढकलतात.



### सुविधा न दिल्यास आंदोलनाचा इशारा

शहरातरात एकीकडे स्मार्ट सिटीच्या माध्यमातून लाखो-कोटी रुपये खर्च करून नव्या सांगवीत 'व्हर्टिकल शाफ्ट'सारखे आधुनिक तंत्रज्ञान आणले जात आहे. ज्याची ट्रायलही सुरू आहे. मग जुन्या सांगवीत हा प्रकल्प का राबविला जात नाही. संगमनगर, प्रियदर्शनीनगर, साई स्नेह पार्क असो वा जयराज पार्क येथे पाण्याची सर्वात मोठी समस्या आहे. प्रशासनाने हा पक्षपात त्वरित थांबवावा आणि जुन्या सांगवीतही हा व्हर्टिकल शाफ्ट प्रकल्प उभा करून येथील नागरिकांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल, अशी भावना सांगवीकरांनी व्यक्त केली आहे.

> फक्त नव्या सांगवीतच पाणी सुरळीत चालले आहे का? मग आमच्या जुन्या सांगवीत पाण्याची एवढी मोठी समस्या असताना येथे हा व्हर्टिकल शाफ्ट का बनवला जात नाही? आमची घरे उंचवट्यावर असल्यामुळे आणि हा भाग 'टेल एंड'ला येत असल्यामुळे आम्हाला कधीही पुरेसे पाणी मिळत नाही. उन्हाळा असो वा पावसाळा, आम्हाला पाण्यासाठी रोज संघर्ष करावा लागतो. जर ती सिस्टीम नव्या सांगवीत होऊ शकते, तर आमच्याकडे का नको? आमच्या भागातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची होणारी ही फरफट थांबवण्यासाठी जुन्या सांगवीतही तातडीने ही सिस्टीम सुरू झालीच पाहिजे.
>
> **- भावना जगताप, स्थानिक महिला.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची २ सप्टेंबरची सभा वादात

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची सप्टेंबर महिन्याची मासिक सर्वसाधारण सभा बुधवारी (दि.2) आयोजित केली आहे. त्यासाठी नियमानुसार सात दिवसांची नोटीस देण्यात आली आहे. त्यामुळे ती सभा नियमाला धरून आहे, असा दावा सत्ताधारी भाजपने केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची वीस ऑगस्टची सर्वसाधारण तहकूब सभा 17 सप्टेंबरला होणार आहे.**



मात्र, स्थायी समितीने केलेल्या ठरावानुसार तसेच, महापौरांनी दिलेल्या पत्रानुसार सप्टेंबर महिन्यातील मासिक सभा बुधवारी आयोजित केल्याचे नगर सचिव विभागाने स्पष्ट केले आहे. मात्र, विषयपत्रिकेत स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय वगळण्यात आला आहे. त्यावरून सत्ताधाऱ्यांकडून सोईस्कर राजकारण सुरू असून, ती सभा नियमाला धरून नाही, असे आरोप केला जात आहे.

दरम्यान, महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार तहकूब सभेव्यतिरिक्त अन्य प्रत्येक सभेची सर्वसाधारणपणे निदान सात पूर्ण दिवसांची नोटीस दिली पाहिजे, असा नियम आहे. सप्टेंबरच्या सभेची नोटीस गुरूवारी (दि.27) काढण्यात आली आहे. त्यामुळे सात दिवस पूर्ण न होताच बुधवारी (दि.2) सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे ती सभा नियमानुसार अधिकृत ठरू शकत नाही, असा आरोप केला जात आहे.

मात्र, नियमानुसार सर्वसाधारण सभेसाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. सर्व 128 नगरसेवकांपर्यंत विषयपत्रिका पोचहवण्यात आली आहे. शहरासाठी आवश्यक असलेले विषय सभेसमोर ठेवण्यात आले आहेत. बोऱ्हाडेवाडी ते वाकड चौक या बीआरटी मार्गावर ई-आरटीएस वाहतूक व्यवस्था सुरू करणे. संपूर्ण शहरात पार्किंग धोरण लागू करणे. निगडी ते चाकण सुधारित मेट्रो डीपीआरला मान्यता देणे. नागरिकांसाठी स्वच्छता आणि आरोग्यासाठी सार्वजनिक शौचालय धोरण लागू करण्यात येत आहे. त्यासह शहराला आवश्यक विषय सभेत घेण्यात आले आहेत, असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले. या सभेत शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेतले जाणार असल्याने सभेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नगर सचिव विभागाने नियम तपासूनच विषयपत्रिका बनवली

सर्वसाधारण सभा घेण्याबाबत महापौरांनी नगरसचिव विभागास पत्र दिले आहे. त्या विभागाने सात दिवसांचा नियम तसेच, सभाशास्त्राचे इतर नियम तपासूनच सभेचे तारीख निश्चित केली आहे. त्यानुसार विषयपत्रिका तयार केली आहे. त्यमुळे बुधवारची सभा नियमाला धरूनच आहे, असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले. सभेच्या आयोजनाबाबत कोणतीही नियमबाह्य प्रक्रिया झालेली नाही. प्रशासनाने सर्व नियमांची पडताळणी करूनच सभेची कार्यवाही निश्चित केली आहे. सभेतील सर्व विषयांवर नियमानुसार चर्चा होऊन आवश्यक निर्णय घेतले जातील, असेही शितोळे यांनी स्पष्ट केले.

# चिंचवडमध्ये जिल्ह्यात सर्वाधिक दुबार मतदार

## मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अंतिम एएसडीडी यादीत 'डुप्लिकेट' मतदार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) पुणे जिल्ह्यात पडताळणी करण्यात आली आहे. यात तयार करण्यात आलेल्या अंतिम एएसडीडी (अनुपस्थित, स्थलांतरित, मृत, दुबार) यादीत जिल्ह्यातील सर्वाधिक दुबार मतदार पिंपरी-चिंचवडमधील चिंचवड विधानसभा मतदारसंघात आढळले आहेत. येथे १४ हजार १६४ दुबार मतदार असून, १३ हजार २३९ मतदारांसह भोसरी दुसऱ्या क्रमांकावर आहे.**



### शहरात एकूण ३४ हजार ४०४ दुबार मतदार

चिंचवड विधानसभा मतदारसंघात १४ हजार १६४ दुबार मतदार आढळले आहेत. विधानसभा मतदारसंघांच्या तुलनेत चिंचवड मतदारसंघातील ही संख्या सर्वाधिक आहे. भोसरीमध्ये १३ हजार २३९ दुबार मतदार असून, तो दुसऱ्या क्रमांकावर आहे. वडगाव शेरीमध्ये १० हजार ८०७ दुबार मतदार आढळले आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघात ७ हजार १ दुबार मतदार आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ३४ हजार ४०४ इतक्या मोठ्या प्रमाणात दुबार नोंदी असल्याचे दिसून येते.

पुणे जिल्ह्यात एसआयआरअंतर्गत एकूण २८ लाख ६८ हजार २२३ मतदार वगळण्यात येणाऱ्या मतदारांच्या यादीत आहेत. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील ६.१२ लाख मतदार आहेत. त्यामध्ये अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांचा समावेश आहे. यापैकी १ लाख ४३ हजार ९७५ मतदार दुबार असल्याचे अंतिम यादीतून समोर आले आहे.

हडपसरमध्ये ६ हजार ९१०, खडकवासला ६ हजार ८५५, कोथरूड ४ हजार १५५, कसबा पेठ ४ हजार ३५४ आणि शिवाजीनगरमध्ये ३ हजार ८७८ दुबार मतदार आढळले आहेत. पुणे कँटोन्मेंट मतदारसंघात ३ हजार ७३९ दुबार मतदार असून, जिल्ह्यात ही संख्या सर्वांत कमी आहे.

एसआयआरच्या अंतिम एएसडीडी यादीत जिल्ह्यातील ३ लाख १२ हजार ४८ मतदार मृत असल्याचे आढळले आहे. यामध्ये कसबा पेठ मतदारसंघात सर्वाधिक २४ हजार ५१९ मृत मतदार आहेत. पिंपरीमध्ये १८ हजार ८२७, चिंचवडमध्ये १७ हजार ६५६, वडगाव शेरीत १६ हजार ४८१, तर पर्वतीमध्ये १६ हजार ३३२ मृत मतदारांची नोंद झाली आहे. एसआयआरच्या अंतिम एएसडीडी यादीत जिल्ह्यातील ३ लाख १२ हजार ४८ मतदार मृत असल्याचे आढळले आहे. यामध्ये कसबा पेठ मतदारसंघात सर्वाधिक २४ हजार ५१९ मृत मतदार आहेत. पिंपरीमध्ये १८ हजार ८२७, चिंचवडमध्ये १७ हजार ६५६, वडगाव शेरीत १६ हजार ४८१, तर पर्वतीमध्ये १६ हजार ३३२ मृत मतदारांची नोंद झाली आहे. वगळण्यात येणाऱ्या मतदारांमध्ये ५ लाख ९१ हजार ३८ मतदार स्थलांतरित असल्याचे समोर आले आहे. पर्वती मतदारसंघात १ लाख २४ हजार ९६८ स्थलांतरित मतदार असून, ही जिल्ह्यातील सर्वाधिक संख्या आहे. मावळमध्ये ७७ हजार ९५, पिंपरीमध्ये २६ हजार ७५५, चिंचवडमध्ये १८ हजार १३० आणि भोसरीमध्ये २४ हजार ६७ मतदार स्थलांतरित असल्याची नोंद आहे. अंतिम एएसडीडी यादीत जिल्ह्यातील १७ लाख ८३ हजार ५८ मतदार अनुपस्थित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय ३८ हजार १०४ मतदार अन्य वर्गवारीत आहेत. या सर्व नोंदींच्या पडताळणीनंतर अपात्र मतदारांची नावे अंतिम मतदारयादीतून वगळण्यात येणार आहेत.

# वल्लभनगर आगारात सुविधांचा बोजवारा; सापांचा वावर अन् प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील महत्त्वाचे परिवहन केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वल्लभनगर आगारातच सुविधांचा बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रवाशांना सेवा देणाऱ्या 'लालपरी'ची दुरुस्ती आणि देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच पाणी, स्वच्छतागृह आणि सुरक्षिततेसाठी संघर्ष करावा लागत असल्याची धक्कादायक परिस्थिती आहे. एकीकडे आगारातील स्वच्छतागृहात पाण्याचा थेंब नाही, तर दुसऱ्या बाजूला बस धुण्याच्या केंद्रात मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध असल्याचे दिसून येते.**



### स्वच्छतागृहात पाणीच नाही

आगारातील यांत्रिकी विभाग आणि मॅकेनिक कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहाची सुविधा असूनही त्याचा वापर करणे कठीण झाले आहे. पाइप जाम झाल्याने पाणीपुरवठा बंद असून, प्लंबिंगचा पाइपही तुटल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आगाराबाहेरील स्वच्छतागृहाचा आधार घ्यावा लागत आहे. यामुळे वेळही वाया जात असल्याची कर्मचाऱ्यांची तक्रार केली जात आहे.

वॉशिंग सेंटरवर गाड्या धुताना मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते. लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र दिसत असताना कर्मचाऱ्यांच्या वापरासाठी असलेल्या स्वच्छतागृहात मात्र पाण्याचा थेंबही उपलब्ध नसणे, ही व्यवस्थेची विसंगती अधोरेखित करणारी बाब आहे. पाण्याचा पुनर्वापर अथवा योग्य नियोजन करण्याची गरज यानिमित्ताने पुढे आली आहे.

आगारात 'नाथजल' पाण्याची बाटली १५ रुपयांची असताना ती २० रुपयांना विकली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत संबंधित यंत्रणेने दरफलक, विक्रीदर आणि प्रत्यक्ष आकारणी याची तपासणी करण्याची गरज आहे असे नागरिक मागणी करत आहेत. स्वच्छतागृहातील पाणीपुरवठ्याबाबत पाइप जाम झाल्याने पाणीपुरवठा बंद आहे तसेच प्लंबिंगचा पाइप तुटल्याने लवकरच दुरुस्त करत आहोत .स्वच्छतेबाबतही सुचना दिल्या असल्याचे आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील यांनी सांगितले.

वॉशिंग सेंटर आणि वाहन परीक्षण कक्षाच्या परिसरात पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचले असल्याचे खड्डे देखील पडले आहेत. खड्डयात पाणी साचून डासांचा प्रादुर्भाव आणि दुर्गंधी पसरली आहे. चिखल आणि साचलेल्या पाण्यातून ये-जा करताना कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

आगार परिसरातील अस्वच्छता, साचलेले पाणी आणि राडारोड्यामुळे घोणससारख्या सापांचा वावर वाढल्याची तक्रार आहे. त्यामुळे यांत्रिकी विभागातील कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असल्याचे चित्र आहे. प्रवासी परिसरातही अस्वच्छता कायम असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बसस्थानक परिसरात रात्रीच्या वेळी मद्यपींचा वावर असतो. परिसरात दारूच्या रिकाम्या बाटल्या पडलेल्या आढळून येते. यामुळे विशेषतः महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या भागात प्रभावी गस्त गरजेचीआहे.

DTE Code
6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507